थोडक्यात

भारतीयांची चमक

ओसिजेक (क्रोएशिया) : सरावासाठी क्रोएशिया दौऱ्यावर असणाऱ्या भारताच्या नेमबाजांनी युरोपियन अजिंक्यपद स्पर्धेत चमक दाखवली. या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीपर्यंतच भाग घेता येणाऱ्या निमंत्रित भारतीय नेमबाजांपैकी सौरभ चौधरीने १० मीटर एअर पिस्तूलमध्ये अव्वल ठरलेल्या युरोपियन नेमबाजापेक्षा वरचढ कामगिरी केली. सौरभने ५८९, तर अभिषेक वर्माने ५७९ गुणांची कमाई केली.

'देणे शिल्लकच'

मेलबर्न : 'निलंबित कोची संघाने २०१०च्या आयपीएलमधील माझा मोबदला देण्याविषयी काय ठरवले आहे? याची माहिती बीसीसीआय तुम्हाला मिळाली का?' असा खोचक सवाल ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज ब्रॅड हॉजने ट्विटरहून केला आहे. आपला दहा वर्षांपूर्वीचा ३५ टक्के मोबदला अजूनही शिल्लक असल्याचे त्याचे म्हणणे आहे.

मिल्खा रुग्णालयात

चंडीगढ : भारताचे महान धावपटू मिल्खासिंग यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. करोना झाल्याने ते सुरुवातीला घरीच विलगीकरणात होते. मिल्खा यांची तब्येत स्थिर असून खबरदारी म्हणून त्यांना रुग्णालयात ठेवण्यात आल्याचे त्यांचा गॉल्फर मुलगा जीव मिल्खासिंगने सांगितले.

रणजीपटू वंचितच

नवी दिल्ली : करोनामुळे गेल्या मोसमात रणजी करंडक रद्द झाला. त्याची भरपाई म्हणून बीसीसीआयकडून रणजीपटूंना भरपाई मिळणार होती. मात्र राज्य असोसिएशनने अद्याप आवश्यक ती माहिती पुरवली नसल्याने रणजीपटू भरपाईपासून वंचित आहेत, असे बीसीसीआयचे खजीनदार अरुण धुमल म्हणाले.

रेनेडीचा पुढाकार

नवी दिल्ली : भारतीय फुटबॉल संघाचा माजी मिडफील्डर रेनेडीसिंगने आपल्या मणीपूर राज्यातील करोना लढाईत पुढाकार घेतला आहे. सध्या तो करोना रुग्णांसाठी ऑक्सिजन सिलिंडर मिळवून देण्याचे काम करतो आहे. विशेष म्हणजे भारतीय संघाचा तारणहार असे टोपणनाव रेनेडीने आपल्या कामगिरीने कमावले होते. आता तो रुग्णांचा तारणहार आहे.

कुस्तीची पाठ धुळीला!

सुशीलप्रकरणी भारतीय फेडरेशनचे सहाय्यक सचिव तोमर यांचे मत

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

'भारताचा दुहेरी ऑलिम्पिक पदकविजेता मल्ल सुशीलकुमारच्या अटकेमुळे देशातील कुस्तीच्या प्रतिमेलाच धक्का बसला, कुस्ती कलंकीत झाली आहे', असे मत भारतीय कुस्ती फेडरेशनचे सहाय्यक सचिव विनोद तोमर यांनी व्यक्त केले आहे. गेल्या रविवारी सुशीलला त्याचा सहाय्यक अजयसह राजधानी दिल्लीतील मुंदका या विभागातून अटक करण्यात आली. चार मे रोजी दिल्लीतील छत्रसाल स्टेडियममध्ये झालेल्या हाणामारीत मल्ल सागर धनकडला जीव गमवावा लागला. त्याच्या हत्येचा आरोप सुशीलवर आहे.

सुशीलच्या प्रकरणाचा निकाल जो काही लागेल; पण यामुळे खेळाची प्रतीमा काळवंडली आहे, असे विनोद तोमर यांना वाटते. 'कायदा, न्यायव्यवस्था सुशीलच्या बाबतीत योग्य तो न्यायनिवाडा करेल. तो दोषी ठरेल किंवा निर्दोष हे येत्या काळात स्पष्ट होईल; पण कुस्तीचे मात्र नुकसान झाले आहे. भारतात कुस्तीला सर्वोच्च स्थानावर नेण्यात सुशीलची भूमिका महत्त्वाची होती. त्याने अनेक मल्लांना मदतही केली, त्यांची कारकीर्द घडवण्यात महत्त्वाची भूमिका निभावली. मात्र या हत्येच्या प्रकरणामागे नेमके काय सत्य आहे ते आपल्याला सध्या ठाऊक नाही. कायदा योग्य ते ठरवेल; पण जोपर्यंत या प्रकरणाचा निकाल लागत नाही. तोपर्यंत फेडरेशनला सुशीलबद्दल सहानुभूती आहे. या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत फेडरेशनही त्याच्याबाबत काही निर्णय घेऊ शकत नाही', असे तोमर सांगतात.

दृष्टिक्षेप

- या प्रकरणामुळे खेळाची प्रतीमा काळवंडली आहे, असे विनोद तोमर यांना वाटते.
- कुस्तीचे नुकसान झाल्याची भावना.
- सुशील प्रकरणाबाबत चर्चा करण्यासाठी फेडरेशनच्या अध्यक्षांसह बैठकीचे आयोजन.

बैठकीचे आयोजन

भारतीय कुस्ती फेडरेशनचे सहाय्यक सचिव असणारे विनोद तोमर यांनी दिलेल्या माहितीनुसार सुशील प्रकरणाबाबत चर्चा करण्यासाठी फेडरेशनच्या अध्यक्षांसह बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

रेल्वेकडून निलंबनाची तयारी

नवी दिल्ली : अटक झाल्यानंतर उत्तर रेल्वेकडून सुशीलच्या निलंबनाची तयारी सुरू झाली आहे, अशी माहिती उत्तर रेल्वेच्या प्रवक्त्यांनी सोमवारी दिली. दिल्ली सरकारने २०१५पासून सुशीलला उत्तर रेल्वेत वरिष्ठ व्यावसायिक व्यवस्थापक हे पद दिले आहे. यानुसारच सुशील छत्रसाल स्टेडियममध्ये विशेष कर्तव्य अधिकारी या पदावर नियुक्त आहे. सुशीलनेही या पदाचा कारभार २०२१पर्यंत आपल्याकडे द्यावा अशी विनंती केली होती. मात्र दिल्ली सरकारने सुशीलची ही विनंती फेटाळून त्याला पुन्हा उत्तर रेल्वेतच परत जाण्यास सांगितले होते. आता सुशीलच्या निलंबनाची ऑर्डर काही दिवसांतच तयार होईल, असेही रेल्वेच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. रेल्वेच्या सीनियर अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार एखाद्या सरकारी अधिकाऱ्याविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल झाल्यास तो किंवा ती यांना नियमानुसारच खटला चालेपर्यंत निलंबित करावेच लागते. शिकाऊ मल्ल सागर धनकडच्या हत्येनंतर सुशील तीन आठवडे फरार होता. त्याला साथीदार अजयसह गेल्याच रविवारी पोलिसांनी पकडले.

सुशीलकुमारची लपाछपी 'काला जठेडी'पासूनही

टाइम्स वृत्त, नवी दिल्ली

हत्येच्या आरोपानंतर आंतरराष्ट्रीय मल्ल सुशीलकुमार १८ दिवस फक्त दिल्ली पोलिसांपासूनच लपत नव्हता तर उत्तर भारतातील 'मोस्ट वॉंटेड' गुंड संदीप उर्फ 'काला जठेडी'पासूनही पळत होता. पोलिसांना सुगावा लागू नये म्हणून सुशीलने फोन करण्यासाठीही इंटरनेट डॉंगलचा वापर केला. अन् अशाच फोनचा वापर करत त्याने जठेडीची माफी मागण्याचाही प्रयत्न केला असल्याची माहिती सुत्रांकडून टाइम्स समुहाला मिळाली आहे.

एवढेच काय, पण सागरच्या हत्येबद्दल सुशीलला पश्चाताप नसल्याचे रविवारी अटक झाल्यानंतर समोर आले आहे. पोलिसांनी 'काला जठेडी' गँगपासून अन् सध्या तुरुंगात असलेल्या या गँगच्या गुंडांपासून आपले संरक्षण करावे, अशी सुशीलची मागणी आहे. जठेडी हा सध्या दुबईत असल्याचे कळते.

ही गँग सुशीलच्या मागे लागण्यामागेही कारण आहे. ज्यावेळी सुशीलने धनकड अन् त्याच्या सहकाऱ्यांना बेदम मारले तेव्हा त्यात सोनू नावाचा मुलगाही होता. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला सोनू हा 'काला जठेडी'चा भाचा अन् मानस पूत्र आहे. त्यामुळे सोनूला झालेल्या मारहाणीचे पडसाद जास्त दिसले. दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार जठेडी हा सोनूला हाताशी घेऊन दिल्लीत मोठ्या मालमत्ता हडपण्याचे काम करतो. सुशीलने या जठेडीशी हात मिळवणी करत दिल्लीतील मॉडेल टाउनमध्ये घर घेतले होते. ज्यावरुनच ४ मे रोजी वादग्रस्त हाणामारी झाली. या घराचा वापर गँगमधील आश्रय देण्यासाठीही केला जात असे समजते.

मुंबई प्रशिक्षकपदासाठी अमोल, बहुतुलेचे अर्ज

मुंबई : देशांतर्गत क्रिकेटमधील महान फलंदाज अमोल मुझुमदार, भारताचे माजी लेगस्पिनर साईराज बहुतुले आणि माजी यष्टीरक्षक सुलक्षण कुलकर्णी यांनी मुंबई क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदासाठी अर्ज केला आहे. रमेश पोवार यांची भारतीय महिला क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदी निवड झाल्यानंतर हे पद रिक्त झाले आहे. गेल्याच आठवड्यात प्रशिक्षकपदासाठी अर्ज करावेत अशी जाहिरात मुंबई क्रिकेट असोसिएशनने केली होती. या पदासाठी अर्ज करणाऱ्या क्रिकेटपटूला ५० प्रथम श्रेणी क्रिकेट सामन्यांचा अनुभव असणे आवश्यक आहे, अशी अटही आहे. मुंबईचे माजी रणजी विजेते कर्णधार अमोल मुझुमदार यांनी बीसीसीआयच्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत फलंदाजी प्रशिक्षकाची भूमिका पार पाडली आहे. शिवाय आयपीएलमध्ये त्यांनी राजस्थान संघासह काम केले आहे. शिवाय भारत दौऱ्यावर आलेल्या पाहुण्या द. आफ्रिका संघासाठी अमोल यांनी सल्लागार म्हणूनही काम पाहिले आहे.

शर्यतीत सुलक्षण कुलकर्णीही

दोन कसोटी आणि आठ वनडेंमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेले बहुतुले हेदेखील देशांतर्गत क्रिकेटमधील यशस्वी नाव. १८८ प्रथम श्रेणी लढतींमध्ये त्यांनी ६३० विकेट टिपल्या असून विदर्भ, केरळ, बंगाल आणि गुजरात संघाच्या प्रशिक्षकपदाची सुत्रे त्यांनी सांभाळली आहेत.

२०१२-१३च्या मोसमात रणजी जिंकणाऱ्या मुंबई संघाचे प्रशिक्षकपद सुलक्षण कुलकर्णी यांनी भूषविले आहे. याशिवाय त्यांनी विदर्भ आणि छत्तीसगढच्या प्रशिक्षकपदाची जबाबदारीही हाताळली आहे.

हुसमुद्दीन उपांत्यपूर्व फेरीत

दुबई : भारताच्या महंमद हुसमुद्दीन याने आशियाई अजिंक्यपद बॉक्सिंग स्पर्धेत धडाक्यात सुरुवात केली. राष्ट्रकुलमधील ब्राँझविजेत्या हुसमुद्दीनने ५६ किलो गटाच्या लढतीत कझाकिस्तानच्या मखमूद सबीरखानवर मात केली आणि उपांत्यपूर्व फेरी गाठली.

हुसमुद्दीनने दोन वेळा एशियन यूथ चॅम्पियन ठरलेल्या १९ वर्षीय सबीरखानला ५-० असे पराभूत केले. या लढतीत युवा सबीरखानने कडवी झुंज दिली.

चॅम्पियन्स लीगचे प्रवेश निश्चित

वृत्तसंस्था, मिलान/लिव्हरपूल

एसी मिलान, युव्हेंट्स, लिव्हरपूल, चेल्सीला स्थान

आठ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर सातवेळा विजेता ठरलेल्या एसी मिलानने चॅम्पियन्स लीग फुटबॉल स्पर्धेत प्रवेश मिळवला आहे. इटलीतील सिरी ए या स्पर्धेतून युरोपातील क्लबच्या प्रतिष्ठीत चॅम्पियन्स लीगमध्ये युव्हेंट्सनेही स्थान निश्चित केले आहे. फ्रँक केसीने पेनल्टीवर केलेल्या दोन गोलमुळे एसी मिलानने सीरि ए स्पर्धेच्या लढतीत अटलांटावर २-० अशी मात करत प्रवेश निश्चित केला. अटलांटा या संघाने आधीच सीरि ए जिंकणाऱ्या इंटर मिलानसह चॅम्पियन्स लीगमधील प्रवेश निश्चित केला होता.

युव्हेंट्सने बॉलोग्नाचा ४-१ असा सहज पराभव केला. अल्वारो मोराताने दोन गोल तडकावले, तर फेडरिको चीसा आणि ॲड्रियन रॅबियोटने प्रत्येकी एक गोल करत युव्हेंट्सच्या विजयात मोलाचा हातभार लावला. एवढेच नव्हे तर चॅम्पियन्स लीग प्रवेशासाठी युव्हेंट्सला दुसऱ्या संघाकडून सकारात्मक निकाल आवश्यक होता. हॅलास वेरोनाने नॅपोलीला १-१ बरोबरी रोखले अन् युव्हेंट्सचा मार्ग मोकळा झाला. यामुळे युव्हेंट्स सीरि ए स्पर्धेच्या अव्वल चार संघांत आला. नॅपोलीची मात्र पाचव्या क्रमांकावर घसरण झाली. यासह इंटर मिलानने ९१ गुणांसह सीरि ए स्पर्धा जिंकली, तर एसी मिलान (७९) दुसऱ्या, अटलांटा (७८) तिसऱ्या आणि युव्हेंट्स (७८) चौथ्या क्रमांकावर आहेत.

दरम्यान इंग्लिश प्रीमियर लीग (ईपीएल) फुटबॉल स्पर्धेतून लिव्हरपूल आणि चेल्सी या संघांनी अव्वल चारमध्ये स्थान पटकावत चॅम्पियन्स लीग फुटबॉल स्पर्धेतील प्रवेश निश्चित केला; पण पराभव झाल्यामुळे लीस्टर सिटीचा मात्र स्पर्धेतील प्रवेश हुकला. चेल्सीने ॲस्टन व्हिलावर २-१ अशी मात केली.

भारत सरकार टंकसाळ मुंबई
INDIA GOVERNMENT MINT MUMBAI

भारत प्रतिभूति मुद्रण व मुद्रा निर्माण महामंडळ लिमिटेडचे घटक मिनी-रत्न श्रेणी । सीपीएसई (भारत सरकारच्या पूर्णस्वामित्वाधीन) शहिद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001

A Unit of Security Printing and Minting Corporation of India Limited Mini-Ratna Category - I CPSE (Wholly owned by Govt. of India) Shahid Bhagat Singh Road, Fort, Mumbai-400 001

Tel: 022-22703184/85 Fax: 022-22661450 Email: purchase.igmm@spmcil.com Web: igmmumbai.spmcil.com

राष्ट्रीय स्पर्धात्मक बोली आमंत्रणकरिता अभिव्यक्तीची सूचना

भारत सरकार टंकसाळ मुंबई खालीलकरिता पात्र आणि योग्य निविदाकारांकडून मोहोरबंद निविदा मागवीत आहे.

निविदा क्र./ दिनांक	वस्तू/सेवांचा थोडक्यात तपशील	इसारा जमा रक्कम (ईएमडी)	निविदा उघडण्याचा विहित दिनांक व वेळ
6000016324/ 25.05.2021	कारखाना परिसरात वॉटर प्रूफिंग	निरंक	08.06.2021 दुपारी 3.00 वाजता

अधिक तपशिलाकरिता कृपया आमच्या **igmmumbai.spmcil.com** ह्या संकेतस्थळास भेट द्यावी. हिन्दी अनुवाद हमारी वेबसाईट **igmmumbai.spmcil.com** पर उपलब्ध है। शुद्धीपत्रक, जर असेल तर आमच्या संकेतस्थळावर प्रकाशित केले जाईल.

सही/-
मुख्य खरेदी व भांडार अधिकारी
मुख्य महाव्यवस्थापकाकरिता

जाहीर सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, आम्ही **पीबी ग्लोबल लिमिटेड** (पूर्वी 'पेस्टीसाईडस् ॲण्ड ब्रूवर्स लिमिटेड' म्हणून ज्ञात) ज्यांचे नोंदणीकृत कार्यालय चितळसर मानपाडा, स्वामी विवेकानंद रोड, ठाणे - ४००६०७ येथे आहे त्यांच्या खाली लिहीलेल्या **परिशिष्टात** अधिक विशेषत्वाने वर्णन केलेल्या मालमत्तेसंबंधी (**''सदर मालमत्ता''**) हक्कांबाबत चौकशी आणि पडताळणी करत आहोत.

सर्व व्यक्ती / संस्था, कोणतीही बँक आणि/किंवा वित्तीय संस्था ज्यांना कोणताही हक्क, नामाधिकार, लाभ, स्वारस्य, दावा / आक्षेप आणि/किंवा मागणी इत्यादी कोणत्याही प्रकारे सदर मालमत्तेसंदर्भात किंवा त्याच्या कोणत्याही भागावर विक्री स्वरूपात, हस्तांतरण, अदलाबदल, लेट, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, परवाना, लीव्ह ॲण्ड लायसन्स, केअर टेकर तत्त्वावर, भाडेकरार, उप-भाडेकरार, अभिहस्तांकन, मुक्ततेचे करारपत्र, त्याग, गहाण, वारसा, मृत्यूपत्राने मिळकत, परंपरा, भेट, लीन, प्रभार, देखभाल, वहिवाटीचा हक्क, विश्वस्त संस्था, म्युनीमेंट, व्यवसाय, ताबा, कुटुंब व्यवस्थापन / मांडणी, दावा किंवा कोणत्याही इतर पध्दती द्वारा कोणताही वाटप, करारनामा, डीड, कागदपत्र, लेखी स्वरूप, कन्व्हेअन्स डीड, योजना हुकूमनामा, कोणत्याही न्यायालयाचा आदेश किंवा हुकूम, कंत्राट, करारनामे, तारण, धारणाधिकार, विकास हक्क, संयुक्त विकास हक्क, भागीदारी, एफएसआय वापर किंवा टीडीआर, प्रकल्प व्यवस्थापक, विकास व्यवस्थापक किंवा अडथळा किंवा अन्य स्वरूपात असल्यास, लिखीत पद्धतीने कागदोपत्री पुराव्यासह निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या खालील नमूद पत्त्यावर सदर प्रसिद्धीच्या **चौदा (१४) दिवसांत** याद्वारे सूचित करण्याची आवश्यकता आहे. असा दावा प्राप्त न झाल्यास, असा दावा किंवा दावे आणि/किंवा आक्षेप अस्तित्वात नसून अधित्याग केल्याचे वा सोडून दिल्याचे समजण्यात येईल. ह्या सदर जाहीर सूचनेतील संबंधित असलेले सर्व दावे आणि आक्षेप क्र. **R0194** असे नमूद करावे.

परिशिष्ट

औद्योगिक आणि लगतच्या जमिनीचे सर्व तुकडे आणि हिस्से ज्याचे क्षेत्रफळ एकूण २०.९० एकर्स म्हणजेच सुमारे ८४,८५८ चौरस मीटर्स इतकेच किंवा साधारण तेवढेच असून गट क्र. १/१/ए, १/४/बी, १/५, १/६/सी, २/२, २/५, ७/१ आणि ७/२ आहे आणि त्यासोबत त्यावर उभ्या संरचना, ज्या व्हिलेज चितळसर मानपाडा, तालुका ठाणे, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र, भारत येथे स्थित, तेथे आणि त्यावर आहेत.

दिनांक २५ मे, २०२१

सजित सुवर्णा
भागीदार
डीएसके लिगल
वकील आणि सॉलिसिटर्स
१२०३-बीए, वन वर्ल्ड सेंटर, टॉवर २बी, मजला १२ बी,
८४१, सेनापती बापट मार्ग, एलफिन्सटन रोड, मुंबई - ४०००१३

BLUE DART
EXPRESS LIMITED

Regd. Office: Blue Dart Centre, Sahar Airport Road, Andheri (E), Mumbai 400 099. **Tel:** 022-28396444 **Fax:** 022-28244131
Email: communications@bluedart.com **Website:** www.bluedart.com **CIN:** L61074MH1991PLC061074

NOTICE TO SHAREHOLDERS

(For the attention of Equity Shareholders of the Company)

Transfer of Equity Shares of the Company to the Investor Education & Protection Fund

Notice is hereby given that pursuant to provisions of Section 124 of the Companies Act, 2013 read with the Investor Education & Protection Fund Authority (Accounting, Audit, Transfer and Refund) Rules, 2016, as amended, the Equity Shares in respect of which dividend has remained unclaimed or unpaid for seven consecutive years or more shall be transferred to 'Investor Education & Protection Fund' (IEPF) Account. In pursuance of the said Rules, the Company has communicated individually to the concerned shareholders whose shares are liable to be transferred to IEPF Account for taking appropriate action. The Company has also uploaded full details of such shareholders on its website viz; www.bluedart.com.

Notice is hereby given to all such shareholders to make an application to the Company/Registrar by **August 23, 2021** with a request for claiming unpaid dividend from the year 2013-2014 onwards so that these shares are not transferred to IEPF. **It may be noted that if no response or claim is received by the Company or its Registrar by August 23, 2021, the Company will be constrained to transfer such shares to the IEPF account, without any further notice, by following the due process of law as enumerated in the IEPF Rules** viz;(i) In case of shares held in the physical form – by issuance of duplicate share certificate and thereafter, transferring the same to IEPF authority; (ii) In case of shares held in the dematerialised mode – by transfer of shares directly to the Demat Account of IEPF Authority with the help of Depository Participants.

Concerned shareholders may note that both the unclaimed dividend and the shares transferred to the IEPF Authority Account including all benefits accruing on such shares, if any, can be claimed back by them from the IEPF Authority by filing e-form No. IEPF-5 as prescribed under the provisions of said Rules.

In case if shareholders have any queries on the subject matter and Rules, they may contact the Company's Registrar & Transfer agents at M/s. Link Intime India Pvt Ltd. C 101, 247 Park, L B S Marg, Vikhroli West, Mumbai 400 083. Email: rnt.helpdesk@linkintime.co.in. , Tel.no:022-49186270.

for **Blue Dart Express Limited**
Sd/-
Tushar Gunderia
Sr. Vice President
Head (Legal & Compliance) & Company Secretary

Place : Mumbai
Date : May 24, 2021

एम एम आर डी ए MMRDA
महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र सरकारचा उपक्रम)
Maha Mumbai Metro Operation Corporation

४ था मजला, नामट्री इमारत, प्राधिकरणाच्या नवीन इमारतीजवळ, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ वेबसाईट : https://mmrda.maharashtra.gov.in

महामंडळामध्ये खालील नमूद पदे कायमस्वरूपी भरणेकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ. क्र.	पदांची नावे	खुला	अ.ज.	एकूण पदे
१.	असिस्टंट मॅनेजर (पी/वे)	-	०१	०१
२.	मॅनेजर (ट्रेनिंग)	०१	-	०१
	एकुण	०१	०१	०२

शासनाच्या / पीएसयु / रेल्वे / मेट्रो मध्ये कार्यरत अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालया मार्फत योग्य त्या मार्गाने पाठविण्यात यावेत. तसेच त्यांनी मुलाखतीच्या वेळी ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) सादर करणे आवश्यक आहे.

विस्तृत जाहिरात, शैक्षणिक अर्हता, अनुभव, वेतन श्रेणी आणि इतर सूचनांकरिता कृपया प्राधिकरणाच्या वेबसाईटला भेट द्या : **https://mmrda.maharashtra.gov.in (Divisions-> Administration -> Recruitment).** किंवा **https://www.mmmocl.co.in/careers.html (Career Section).**
अर्ज करण्याची **शेवटची तारीख** १४/०६/२०२१ असेल.

सही/-
(डि. के. शर्मा)
व्यवस्थापकीय संचालक
म.मुं.मे.सं.म.म.

दिनांक : २५ मे २०२१

Fulrani

SBI

भारतीय स्टेट बँक
(भारतीय स्टेट बँक कायदा, 1955 अंतर्गत निर्मिती)

शेअर्स आणि बाँड्स विभाग, कॉर्पोरेट केंद्र, स्टेट बँक भवन, मादाम कामा रोड, नरिमन पॉइंट, मुंबई - 400 021.
वेबसाइट: https://bank.sbi, ईमेल: investor.complaints@sbi.co.in
फोन: 022-22741474, 22740847, 22742403, 22740841, 22740846, 22740843.

भागधारकांनो कृपया लक्ष द्या

लाभांश, लाभांशावरील कराची कपात ह्याची घोषणा आणि पुस्तक समाप्तीची सूचना

प्रिय भागधारकांनो,

आमच्या बहुमोल भागधारकांना आम्ही आनंदाने सूचना देत आहोत की आपल्या बँकेच्या केंद्रीय मंडळाने 21 मे 2021 रोजी भरलेल्या बैठकीत 31 मार्च 2021 रोजी समाप्त झालेल्या आर्थिक वर्षासाठी प्रत्येक समभागाकरिता रु.4/- लाभांश घोषित केला आहे. लाभांश देण्याची नोंदीची तारीख 04 जून 2021 असेल. लाभांश 18 जून 2021 रोजी दिला जाईल.

2. **ह्याद्वारे सूचना दिली जात आहे की भारतीय स्टेट बँकेच्या भागधारकांची नोंदवही दिनांक 05.06.2021 (शनिवार) ते 09.06.2021 (बुधवार) पर्यंत आर्थिक वर्ष 2020-21 चा लाभांश देण्यासाठी, भागांच्या हस्तांतरणाकरिता बंद राहील.**
3. फायनान्स कायदा, 2020 नुसार बदलेलेल्या आयकर कायदा, 1961 (कायदा) नुसार 01 एप्रिल 2020 नंतर बँकेकडून दिल्या जाणारा किंवा वितरित होणारा लाभांश भागधारकांच्या हातात पडताना करपात्र असेल, ज्याची माहिती खाली दिली आहे:
   I. निवासी भागधारकांसाठी, आयकर कायदा, 1961 च्या कलम 194 अंतर्गत आर्थिक वर्ष 2021-22 दरम्यान बँकेकडून घोषित झालेल्या आणि दिलेल्या लाभांशावर 10% कर कपात केली जाईल, ज्यासाठी भागधारकाने पॅन देणे आवश्यक आहे. जर पॅन उपलब्ध नसेल तर आयकर कायदा, 1961 च्या कलम 206एए नुसार @ 20% टीडीएसची कपात होईल.
   II. जर आर्थिक वर्ष 2021-22 दरम्यान निवासी व्यक्तींना दिला जाणारा लाभांश रु.5,000/- पेक्षा जास्त नसेल तर टीडीएसची कपात केली जाणार नाही. कृपया नोंद घ्या की ह्यामध्ये भावी लाभांश असेल तर त्याचाही समावेश असेल, जो आर्थिक वर्ष 2021-22 दरम्यान तुमच्या बँकेच्या केंद्रीय मंडळाकडून घोषित केला जाऊ शकतो.
   III. आयकर कायदा, 1961 च्या तरतुदींनुसार, निवासी आणि अ-निवासी भागधारकांसाठी आणि विविध संस्थात्मक भागधारकांसाठी टीडीएस/विथहोल्डिंग दर वेगवेगळे आहेत.
4. जर भागधारकाने फॉर्म 15 जी (कंपनी किंवा फर्म वगळता इतर कोणत्याही व्यक्तीसाठी लागू आहे)/फॉर्म 15 एच (60 पेक्षा जास्त वय असलेल्या कोणत्याही व्यक्तीसाठी लागू) सादर केला आणि पात्रतेच्या अटी पूर्ण होत असतील तर स्रोतावर कोणतीही कर कपात होणार नाही. कृपया https://einwardsbi.alankit.com वर फॉर्म 15 जी/15 एच/टॅक्स एक्झेंप्शन सर्टिफिकेट आणि पॅनची प्रत ऑनलाइन सादर करा.
5. जर 31.03.2017 पासून आयकर कायदा, 1961 च्या तरतुदींनुसार, निवासी पत्त्यात काही बदल झाला तर कृपया 31.05.2021 आधी sbi.div@alankit.com वर ईमेल करून किंवा खाली पत्ता दिलेल्या आमच्या आरटीएला पत्र लिहून कळवा.
6. योग्य टीडीएस/विथहोल्डिंग कर दराचा विचार करण्यासाठी आणि कपात करण्यासाठी 31 मे 2021 रोजी किंवा आधी वर सांगितलेली कागदपत्रे/निवासी स्थितीची खात्री सादर करा. 31 मे 2021 नंतर कराचा विचार/कपात ह्यासाठी संपर्क केला जाणार नाही. जर तुमच्याकडून वरील तपशील/कागदपत्रे प्राप्त झाली नाहीत आणि सदर लाभांशावर उच्च दराने कपात झाली तर रिटर्न ऑफ इंकम फाइल करण्याचा आणि पात्र असेल तर योग्य परतावा मिळवण्याचा एक पर्याय तुमच्याकडे उपलब्ध राहील.
7. आम्ही तुम्हाला विनंती करत आहोत की तुमच्या डीपीकडे (जर डीमॅट स्वरूपात भागधारणा केली असेल)/आरटीएकडे (जर भौतिक स्वरूपात भागधारणा केली असेल) केव्हायसीचा तपशील, ईमेल आयडी, पत्ता, मोबाइल क्रमांक आणि बँक खात्याचा तपशील अद्ययावत करा, जेणेकरून संपर्क करणे आणि पैसे पाठवणे सोपे होईल.
8. भौतिक भागधारकांना विनंती आहे की डीमॅट स्वरूपात भाग हस्तांतरित करण्यासाठी ₹1 दर्शनी मूल्य एसबीआय शेअर सर्टिफिकेट तुमच्या डीपीकडे सादर करून तात्काळ भाग डीमॅट करा. जर तुमच्याकडे डीमॅट खाते नसेल तर अर्ज आणि अ) पॅन ब) आधार कार्ड क) पासपोर्ट ड) मतदाता ओळखपत्र इ) ड्रायव्हिंग लायसन्स ई) कँसल केलेला चेक इत्यादी अधिकृत वैध केव्हायसी (नो यूअर कस्टमर) सादर करून तुम्ही कोणत्याही डिपॉझिटरी भागीदारांकडे (डीपी) डीमॅट खाते सुरू करू शकता.
9. वरील लाभांशाच्या परताव्याबाबत कोणतीही शंका असेल तर कृपया sbi.div@alankit.com वर मेल करा किंवा खालील पत्त्यावर आरटीएला पत्र लिहा: अलंकित असाइनमेंट्स लिमिटेड, (युनिट: स्टेट बँक ऑफ इंडिया), 205-208, अनारकली कॉंप्लेक्स, झंडेवाला एक्सटेंशन, नवी दिल्ली - 110 055.
   टेलिफोन: 72900 71335.

कोणत्याही एस्केलेशनसाठी तुम्ही येथेही ईमेल पाठवू शकता:
investor.complaints@sbi.co.in

तुमच्या सहाय्याबद्दल आणि मदतीबद्दल आम्ही आभारी आहोत.

भारतीय स्टेट बँकेसाठी
श्याम के.
उप महाप्रबंधक
(कंप्लायंस आणि कंपनी सचिव)

स्थान: मुंबई
दिनांक: 25-05-2021

महाराष्ट्र टाइम्स

तुम्हीच बनवा तुमचा मास्क

तो बनवा आशेनं, विश्वासानं.
तो बनवा घरातील वस्तूंपासूनच.
त्यासाठी वापरा काहीही
दुपट्टा, रुमाल, टॉवेल किंवा फेटाही.
काहीही वापरा.
फक्त ते स्वच्छ ठेवा.
मास्क होऊ द्या रंगीत -
हिरवा, गुलाबी, काळा किंवा पिवळा.
काही तरी नावीन्यपूर्ण करा.
सर्जनशीलता दाखवा.
मास्कमधूनच दाखवा तुमची ओळख
अन या लढ्यातील तुमचा सहभाग.
मास्क बनवा लढ्यासाठी.
संरक्षणासाठी.
बचावासाठी.
चला तर मास्क बनवा.
तुम्ही काळजी घेत आहात हे दाखवा.
आपण बदल घडवू शकतो हे दाखवा.
आजच मास्क बनवा
स्वत:साठी, देशासाठी!

घरी स्वत: बनविलेला मास्क वापरून तुमचे छायाचित्र काढा आणि तो तुमच्या सोशल मीडिया पेजवर #MaskIndia या हॅशटॅगने शेअर करा.

यांपैकी चांगल्या निवडक छायाचित्रांना महाराष्ट्र टाइम्समध्ये आणि maskindia.com वर प्रसिद्धी मिळेल.

#MASKINDIA

महाराष्ट्र टाइम्स

maharashtratimes.com @mataonline maharashtratimesonline